जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २० दिनांक - ०७/०१/२०२४**

येरवडा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## जुनेद एजाज शेख (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०४ साथीदार यांचेविरुध्द मकोका अंतर्गत कारवाई

दिनांक २६/१२/२०२३ रोजी यातील फिर्यादी हे त्यांचे भावासह लक्ष्मीनगर येरवडा,पुणे येथे बोलत असताना,यातील नमुद इसम जुनेद शेख, अविनाश ऊर्फ सुक्या शिंदे, मंगेश ऊर्फ घुल्या काळोखे, निखील ऊर्फ बॉडी शिंदे व त्यांचे सोबत असणाऱ्या इतर अनोळखी साथीदार यांनी हैद्राबाद हॉटेलचे बाजुने हातातील लोखंडी धारधार हत्यारे व दगड घेवुन येवुन ते हवेत फिरुन येवुन,शिवीगाळ करून,कोई आगे आयेगा,तो नहिं छोडेंगे,अपने अपने घर जाओ असे फिर्यादी व त्यांचे भाऊ तसेच नागीरकांना धमकावुन,त्यांचेवर दगडफेक करुन,फिर्यादी व त्यांचे भाऊ यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांचे हातातील धारधार हत्यारे व दगडांनी फिर्यादीं तसेच परिसरातील इतर २७ वाहनांच्या काचा फोडुन दहशत निर्माण केली. म्हणुन फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने **येरवडा पोलीस ठाणे गु.र.नं.८५४/२०२३,भा.दं.वि.कलम ३०८,३३६,४२७, १४३,१४४,१४७,१४८,१४९,आर्म ॲक्ट ४(२५), महा.पो. का.कलम ३७(१)(३),१३५,क्रिमी.लॉ.ॲमेडमेंट ३ व ७** अन्वये गुन्हा नोंद आहे.

दाखल गुन्ह्याचे तपासा दरम्यान आरोपी **१.जुनेद एजाज शेख,वय-२३ वर्षे,रा.स.नं.१२,पवार चाळ, लक्ष्मीनगर,येरवडा,पुणे (टोळी प्रमुख) २.अविनाश ऊर्फ सुक्या संजय शिंदे,वय २१ वर्षे,रा.येरवडा,पुणे ३.मंगेश ऊर्फ घुल्या दिपक काळोखे,वय १९ वर्षे,रा.लक्ष्मीनगर, येरवडा,पुणे,यातील आ.क्र.१ ते ३** यांना दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली असुन, **४.निखील ऊर्फ बॉडी जगन्नाथ शिंदे,वय २३ वर्षे,रा.स.नं.१२,लक्ष्मीनगर,येरवडा,पुणे ५.एक साथीदार (टोळी सदस्य) आ.क्र.४ व** ५ हे पाहिजे आरोपी आहेत.

आरोपी जुनेद एजाज शेख (टोळी प्रमुख) याने व त्याचे इतर टोळी सदस्य यांनी संघटीत गुन्हेगारी टोळी तयार केली असुन,त्याने त्याचे इतर टोळी सदस्य यांचेसह येरवडा परीसरात दहशत निर्माण करून,स्वत:साठी व इतरांसाठी आर्थिक फायदा मिळविण्याचे उद्देशाने तसेच सदर परिसरात त्यांचे टोळीचे वर्चस्व वाढवण्यासाठी हिंसाचाराचा वापर करुन, नागरीकांच्या मनात भिती निर्माण करुन,त्यांनी अवैध मार्गाने आपली बेकायदेशीर कृत्य चालु ठेऊन संघटना किंवा टोळी म्हणुन संयुक्तपणे संघटीत गुन्हेगारी कृत्य करणारा गट तयार केला असुन,सदर टोळीने दरोडा घालणे, सदोष मुनष्यवध करण्याचा प्रयत्न करणे, सार्वजनिक ठिकाणी बेकायदेशीर जमाव जमवणे, दंगा करणे, प्राणघातक हत्यारे सतत जवळ बाळगणे,दुखापत किंवा हमला करण्याची पुर्वतयारी करणे, गृह-अतिक्रमण करणे, निरपराध व्यक्तीस अटकाव करुन अन्यायाची कैद करणे, दहशत माजवणे, जीवे मारण्याची धमकी देणे, आगळीक करुन रोजंदारीवर उदरनिर्वाह असलेल्यांच्या वाहनांच्या काचा फोडुन नुकसान करणे, दिवसा व रात्रीचे वेळी घरफोडी करणे तसेच आजु-बाजुच्या परिसरातील गरीब,असहाय्य युवकांना जमवुन त्यांना पैशाचे व इतर प्रकारचे अमिष दाखवुन,त्यांना वेग-वेगळ्या गुन्ह्या मध्ये त्यांचे साथीदार बनवुन,त्यांचेकरवी गुन्हे केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांचेवर यापुर्वी प्रतिबंधात्मक कारवाई करुन सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटित दहशतीचे मार्गाने स्वतःचे आर्थीक फायद्याकरीता सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने,तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने दाखल गुन्हयात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे ३(१)(ii),३(२),३(४) या कलमाचा अंतर्भाव करणेकामी येरवडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.बाळकृष्ण कदम यांनी पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-४,पुणे शहर, श्री. शशिकांत बोराटे यांच्या मार्फतीने अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं.८५४/२०२३,भा.दं.वि.कलम ३०८, ३३६,४२७,१४३,१४४,१४७,१४८,१४९,आर्म ॲक्ट ४(२५),महा.पो.का.कलम ३७ (१)(३),१३५,क्रिमी.लॉ अमेंडमेंट क. ३ व ७ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणेचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा.सहायक पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे,श्री.संजय पाटील हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,श्री.रामनाथ पोकळे,(अति.कार्यभार),मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०४,श्री.शशिकांत बोराटे, मा.सहा.पोलीस आयुक्त, श्री.संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.बाळकृष्ण कदम, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्रीमती.कांचन जाधव,श्री.जयदिप गायकवाड, निगराणी पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक,महेश लामखडे, पोलीस अंमलदार, सचिन माळी, सचिन शिंदे, देविदास वांढरे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्यानंतर गुन्हेगारी नियंत्राणांवर बारकाईने लक्ष देवुन,शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजा मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल,यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही १११ वी कारवाई आहे.**